POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१७८ ● मुंबई, शुक्रवार, ३० जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA







## अजितदादांना श्रद्धांजली वाहण्यासाठी अलोट जनसागर



## कंठ दाटला, डोळ्यात धारा...

■ बातमी /लेख, विनोद दशगथ मेढे

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची अचानक एक्झिट राज्याला चटका लावून गेली. अनेकांची मनं कालपासून सैरभैर झाली. छत्र गमावल्याच्या प्रतिक्रिया येऊ लागल्या. अनेक कार्यकर्ते, नेते, पुढारी आपण पोरकं झाल्याची प्रतिक्रिया देत आहेत. अनेकांचे डोळे पाणावले आहेत. डोळ्यांच्या कडा ओलावल्या आहेत. अनेकांना उभं करणारं हे उमदं नेतृत्व महाराष्ट्राला पोरकं करून गेलं. काटेवाडीत अजितदादांना श्रद्धांजली वाहण्यासाठी अलोट जनसागर उसळला. ज्याच्या त्याच्या तोंडी असा नेता होणे नाही हीच एक प्रतिक्रिया उमटत होती.

अजितदादांना अखेरचा निरोप देण्यासाठी राज्यभरातून जनसागर लोटला. लोक मिळेल त्या वाहनाने, जमेल त्या साधनांचा वापर करत काटेवाडीत दाखल झाले. काटेवाडीत पाय ठेवायलाही जागा नव्हती. काही किलोमीटरपासून वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. चांद्यापासून ते बांद्यापर्यंतची लोक काटेवाडीत दाखल झाली होती. कालपासूनच राज्याच्या कान्याकोपऱ्यातून लोक इथं दाखल झाली. अजितदादांचं अंतिम दर्शन घेता यावं यासाठी मोठी गर्दी होती. लांबच लांब रांगा होत्या. अजितदादा अमर रहेङ्गअजितदादा परत या..नारे कार्यकर्ते देत होते. यावेळी वातावरण भावूक झाले होते. अनेकांचा कंठ दाटून आला होता. काहींना शब्द फुटत नव्हते. काहींना अश्रू अनावर झाले होते. प्रत्येक जण दादांची आठवण काढत होता. दादांनी त्यांच्या गावासाठी, भागासाठी कोणती योजना दिली. त्यामुळे भागाचा कसा कायापालट झाला याच्याबद्दल जो तो बोलत होता.

मोठी गर्दी झाली होती. अनेक तरुणांचे डोळे पाणावले. महिला विलाप करत होत्या. काहींना काय बोलावे हेच सूचत नव्हते. दादा आपल्यात नाही हीच भावना काहींसाठी धक्कादायक होती. ६५ वर्षांचे गणपत ठोंबरे यांच्या डोळ्यातून घळाघळा पाणी येत होते. त्यांचा कंठ दाटून आला होता. आता २४ तास उलटून गेले. पण दादा आपल्यातून निघून गेले हे मनाला पटत नसल्याचे ते म्हणाले. अजूनही असं वाटतंय की दादा आपल्यातच आहेत. असा नेता पुन्हा होणे नाही. अजितदादांनी राजकारणात अनेक मोठी पदं भूषवली पण ते कधी गावकरी आणि गावाला विसरले नाहीत. दादा गावकऱ्यांच्या छोट्या-मोठ्या अचडणी सोडवायचे. कामचुकारपणा त्यांना खपायचा नाही असं म्हणताना ठोंबरेचे डोळे पाणावले. त्यांना हुंदका आवरता आला नाही.

मुलीचा वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश असो की लग्नाच्या खचार्ची अडचण, गावातील काही काम, योजना रखडली असो दादांच्या कानावर गेलं की ते काम झाल्याशिवाय राहायचं नाही. दादांनी एकदा शब्द दिला म्हणजे ते काम पक्क होणार ही खात्री लोकांना असायची. जे काम होणार नाही, त्याला ते थेट नाही म्हणायचे. दादांचा हा फटकळ स्वभावही अनेकांना आवडायचा. धाराशिव जिल्ह्यातील तेर येथील चंद्रकांत माळी म्हणाले की राज्याने आज हिरा गमावला आहे. असा नेते पुन्हा पुन्हा होत नाही. अजितदादांनी राज्यातील प्रत्येक भागाचा विकास केला. चांगले रस्ते, पूल, सिंचन योजना याबाबतीत त्यांचा दूरदर्शीपणा याची चर्चा होत होती. अनेक जण भावूक झाले होते. अनेकांचा कंठ दाटून आला होता.


## 'दादां'चा राजकीय वारसदार कोण

▸ **सुनेत्रा पवार :** अजित अनंतराव पवार यांच्यानंतर बारामती कोण सांभाळणार हाही एक सवाल आहे. अजित दादांच्या पत्नी सुनेत्रा पवार या बारामतीमधून पोटनिवडणूक लढण्याची शक्यता आहे. सुनेत्रा पवार या सध्या राज्यसभा सदस्य आहेत. नणंद सुप्रिया सुळे यांच्याविरोधात २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता, त्यानंतर पक्षाने त्यांना राज्यसभेची उमेदवारी दिली आणि त्या देखील खासदार म्हणून संसदीय राजकारणात सहभागी झाल्या. विद्यमान खासदार असलेल्या सुनेत्रा पवार या बारामती विधानसभा लढवण्याची शक्यता कमी आहे, मात्र पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पद त्यांच्याकडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

▸ **पार्थ पवार :** अजित पवारांचे राजकीय वारसदार म्हणून दुसरं नाव समोर येतं ते त्यांचे ज्येष्ठ पुत्र पार्थ यांचे. पार्थ पवार यांनी २०१९ मध्ये मावळ लोकसभा निवडणूक लढवली होती. त्यांच्या उमेदवारीला पक्षाचे तत्कालिन अध्यक्ष आणि पवार कुटुंबाचे भीष्म पितामह शरद पवारांचा विरोध होता. एकाच कुटुंबात किती जणांना उमेदवारी द्यायची, असा त्यांचा सवाल होता. मात्र नातवाचा हट्ट अखेर ते मोडू शकले नाही आणि मावळ लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार होते. या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. निवडणुकीत पराभूत होणारे पहिले पवार ते ठरले. त्यानंतर पार्थ पवारांनी कोणतीही निवडणूक लढवली नाही. दरम्यान, अजित पवार भाजपसोबत सत्तेत सहभागी झाल्यानंतर पार्थ पवार यांचा पक्ष कामातील सहभाग वाढला आहे. पक्षाच्या सोशल मीडियाची जबाबदारी त्यांनी स्वतःकडे घेतली. मात्र गेल्या काही महिन्यात कोरेगाव पार्क येथील सरकारी जमीन व्यवहार घोटाळ्याचे त्यांच्यावर गंभीर आरोप झाले. याप्रकरणी चौकशी सुरु आहे. या पार्श्वभूमीवर पार्थ पवारांकडे बारामतीची जबाबादारी आणि दादांचा राजकीय वारसदार म्हणून सध्याच पाहता येईल ही शक्यता कमी आहे.

▸ **जय पवार :** अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष होण्याची शक्यता अधिक आहे. तर अजित पवारांचे राजकीय वारसदार आणि बारामतीची जबाबदारी जय पवार यांच्याकडे दिली जाण्याची शक्यता अधिक आहे. जय पवार यांची राजकीय पाटी कोरी आहे. कोणत्याही वादात त्यांचे नाव नाही. पक्षात दोन गट पडल्यानंतर झालेल्या बारामती विधानसभा निवडणुकीत शरद पवार गटाकडून युगेंद्र पवारांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर अजित पवार गटाकडून जय पवार यांना उमेदवारीची मागणी कार्यकर्त्यांकडून होत होती. मात्र अजित पवारांनी स्वतःच निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर जय पवारांचे नाव मागे पडले. नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत जय पवार बारामती नगरध्यक्ष पदाची निवडणूक लढण्याची चर्चा होती, मात्र त्यावेळीही अजित पवारांनी कार्यकर्त्यांना संधी दिली. मात्र आता अजित पवार यांचा राजकीय वारस म्हणून जय पवार यांचे नाव प्रामुख्याने पुढे येत आहे. राजकारणातील त्यांची कोरी पाटी हाच त्यांचा प्लस पॉईंट ठरु शकतो.

▸ **सुप्रिया सुळे :** अजित पवार यांची चुलत बहीण बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे या देखील अजित दादांच्या राजकीय वारस ठरू शकतात. राष्ट्रवादी मध्ये अलिखित नियम आहे की, राज्यात दादा आणि केंद्रात ताई. मात्र आता अजित दादांच्या अकाली जाण्याने राज्याच्या राजकारणात सुप्रिया सुळे येण्याची चर्चा सुरु झाली आहे. बारामती विधानसभा निवडणूक त्या लढण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फुट पडल्यानंतरही पवार कुटुंबात मात्र फुट पडलेली नव्हती. अनेक कौटुंबिक सोहळ्यात शरद पवार, अजित पवार आणि सुप्रिया सुळे हे एकत्र दिसले. जय पवार यांच्या साखरपुड्यापासून लग्नसोहळ्यापर्यंत संपूर्ण पवार कुटुंब राजकीय अभिनिवेष बाजूला ठेवून एकत्र आलेले होते. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत पुणे आणि पिंपरी चिंचवड येथे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची युती होती. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत घड्याळ चिन्हावरच दोन्ही राष्ट्रवादीने निवडणूक लढवावी अशीही चर्चा सुरु होती. मनपा निवडणुकीपासून दोन्ही राष्ट्रवादीमध्ये वाढलेली जवळीक पाहाता अजित दादांची राजकीय वारस अर्थात पक्ष आणि बारामतीच्या पोटनिवडणुकीची जबाबदारी सुप्रिया सुळे यांच्याकडे येण्याची शक्यता आहे. त्यांच्याकडे सध्या पक्षाच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी आहे. पक्षात काम करण्याचा अनुभव आहे. संसदीय राजकारणाची माहिती आणि जाण आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास सुप्रिया सुळे ह्या अजित पवारांच्या राजकीय वारसदार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.




■ मुंबई । प्रतिनिधी,

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी बारामती येथे विमान अपघातात निधन झाले. आज बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात लाखोंच्या जनसमुदायाच्या साक्षीने मुलगा पार्थ आणि जय पवार यांनी अजित पवारांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. अजित पवार यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अजित पवारांचे नसणे ही जेवढी राजकीय क्षती आहे, तेवढीच ती पवार कुटुंबियांसाठी न भरुन निघणारी हानी आहे. अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष होते, बारामतीचे आमदार आणि राज्याचे उपमुख्यमंत्री होते. त्यांचा राजकीय वारसदार कोण असा प्रश्न आता निर्माण झाला आहे.

### अजितदादांचा राजकीय वारसदार कोण?

अजित पवार यांनी भाजपसोबत सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेत काका शरद पवारांपासून वेगळे होत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ताब्यात घेतला होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष झाल्यानंतर लोकसभा आणि विधानसभा अशा दोन निवडणुका त्यांच्या नेतृत्त्वात लढल्या गेल्या. बारामतीमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच लढत झाली, पवार विरुद्ध पवार अशी लढत महाराष्ट्र आणि देशाने पाहिली. यामध्ये केंद्रात शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे पोहोचल्या तर विधानसभेत अजित दादांचा विजय झाला. त्यामुळे पवार कुटुंबात ज्या प्रमाणे केंद्र आणि राज्यातील विभागणी झाली होती, ती राष्ट्रवादीचे दोन गट झाल्यानंतरही कायम राहिली. मात्र आता अजित पवारांच्या अकाली निधनाने त्यांचा राजकीय वारसदार कोण असणार या सवाल उपस्थित होत आहे.

## सुमित कपूर, शांभवी पाठक, विदीप जाधव, पिंकी माळी यांच्यावर काळाचा घाला




**बारामतीत झालेल्या या विमान दुर्घटनेत केवळ अजित पवारांचाच नव्हे तर विमानाच्या पायलटसह पाच जणांचा मृत्यू झाला. या विमानातील क्रूमध्ये पायलट कॅप्टन सुमित कपूर, विमानाची सहपायलट कॅप्टन शांभवी पाठक, अजित पवारांचे सहकारी पोलीस शिपाई विदीप जाधव आणि फ्लाइट अटेंडंट पिंकी माळी यांच्यावरही काळाने घाला घातला.**

▸ मूळचे सातार्‍याचे असलेले पोलीस शिपाई विदीप जाधव हे २००९ पासून मुंबई पोलीस दलात कार्यरत होते. त्यांच्या पश्चात आई-वडील पत्नी आणि एक मुलगा आणि एक लहान मुलगी असा त्यांचा परिवार आहे. ठाण्यातील विटावा परिसरामध्ये राहणारे विदीप हे गेले काही वर्षे अजित पवारांचे बॉडीगार्ड म्हणून सावलीसारखे त्यांच्यासोबत असायचे. एक शिस्तबद्ध आणि सतर्क अंगरक्षक म्हणून पोलीस दलात त्यांची ओळख होती. अजित पवार यांचे दौरे असोत किंवा सार्वजनिक सभा, विदीप जाधव कायम त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी चोख पार पाडत असत. जाधव यांच्या मृत्यूच्या बातमीने कुटुंबाचा कर्ता पुरुष हरवल्याची भावना व्यक्त होत आहे.

▸ विमानाचे मुख्य पायलट कॅप्टन सुमित कपूर यांना जवळपास १६ हजार तास विमान चालवण्याचा प्रदीर्घ अनुभव होता. सुमित कपूर हे अपघातग्रस्त विमानाचे पायलट इन कमांड म्हणून काम पाहत होते. फ्लाइट क्रूचे नेतृत्व तेच करत होते. टेक ऑफ आणि लँडिंगचे नेतृत्वही त्यांच्याकडे होते. सहारा, जेट एअरवेज यांसारख्या मोठ्या कंपन्यांमध्ये काम केलेले कपूर हे या क्षेत्रातील दिग्गज मानले जात होते. त्यांचा मुलगाही याच कंपनीत वैमानिक आहे.

▸ या विमान दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या शांभवी पाठक या विमानाच्या सहपायलट होत्या. त्या फक्त २५ वर्षांच्या होत्या. ग्वाल्हेरमधील वायु सेना बालभारती स्कूलमधून त्यांनी प्राथमिक शिक्षण घेतले. मुंबई विद्यापीठातून 'एरोनॉटिक्स' (वैमानिकी) या विषयात पदवी घेतल्यानंतर त्यांनी न्यूझीलंडमधील एका प्रसिद्ध व्यावसायिक पायलट अकादमीत प्रशिक्षण घेतले. २०१९ पर्यंत त्यांनी भारत आणि न्यूझीलंडचे कमर्शियल पायलट म्हणून लायसन्स मिळवले होते. पायलट होण्याबरोबरच त्या इतर उमेदवार पायलट्सना प्रशिक्षण देण्याचे कामही मध्य प्रदेश फ्लाइंग क्लबमध्ये करत होत्या. २०२२ पासून व्हीएसआर व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत फर्स्ट ऑफिसर पदावर कार्यरत होत्या. शांभवी यांना नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) कडून व्यावसायिक पायलट परवाना मिळाला होता. त्यांचे वडील सैन्यदलात अधिकारी पदावर कार्यरत होते. तसेच शांभवी पाठक यांना १५०० तास विमान उड्डाणांचा अनुभव होता.

▸ फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी (२९) गेल्या सहा वर्षापासून या क्षेत्रामध्ये काम करत होत्या. गेल्या वर्षभरापासून त्या व्हीएसआर कंपनीमध्ये कार्यरत होत्या. यापूर्वी त्यांनी सांताक्रूझ येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावर काम केले आहे. त्या मूळच्या उत्तर प्रदेशमधील जौनपूरच्या होत्या. तीन पिढ्यांपासून माळी कुटुंबीय मुंबईतील वरळी सेंच्युरी मिल परिसरामध्ये वास्तव्याला होते. दोन वर्षांपूर्वी त्यांचा विवाह झाला होता. सध्या पतीसह त्या ठाण्यात राहत होत्या. त्यांच्या पश्चात पती, वडील शिवकुमार माळी, आई आणि एक लहान भाऊ आहे. त्यांचे पती एका खासगी कंपनीत नोकरीला आहे.



## अजितदादांच्या आई टीव्ही पाहत असताना अचानक बातमी आली अन् टीव्हीचा केबल तोडला

■ मुंबई । प्रतिनिधी,

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा आज सकाळी बारामतीत झालेल्या विमान अपघातात मृत्यू झाला. जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी ते बारामतीला येत होते, पण विमानतळावर लँडिंग करण्यापूर्वीच विमान क्रॅश झाले. या भीषण अपघातात अजित पवारांसह विमानातील इतर चार जणांचाही मृत्यू झाला. या दुर्घटनेने संपूर्ण महाराष्ट्र शोकाकुल झाला आहे. अपघाताची बातमी समोर येताच अजित पवार यांच्या बारामतीतील फार्महाऊसवर एक हृदयद्रावक प्रसंग घडला. अपघाताच्या वेळी अजितदादांच्या आई आशाताई पवार टीव्ही पाहत बसल्या होत्या. फार्महाऊसचे मॅनेजर संपत धायगुडे यांनी माध्यमांशी बोलताना हा मन सुन्न करणारा प्रसंग सांगितला.

संपत धायगुडे यांनी दिव्य मराठीशी बोलताना सांगितले की सकाळी सात वाजता आशाताई नेहमीप्रमाणे टीव्ही पाहत बसल्या होत्या. आम्ही त्यांना नाश्ता देण्याची तयारी करत होतो. त्यानंतर साडेआठच्या सुमारास टीव्हीवर अचानक 'अजित पवार यांचे विमान कोसळले' अशी बातमी झळकली. आईंनी लगेच आम्हाला विचारले, "अरे, दादांचा अपघात झालाय का? काही झालंय का?"

आम्हाला वाटले, कदाचित खरचटले असेल, काही गंभीर नाही. पण पुढे बातम्या येऊ लागल्या, 'अजित पवारांना बारामतीच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले', 'प्रकृतीबाबत माहिती येणार' अशा बातम्या. आईंनी हे सर्व ऐकू नये म्हणून आम्ही तातडीने बंगल्यावरील टीव्हीची केबल तोडली आणि टीव्ही बंद पडल्याचे सांगितले. त्यांचा मोबाईलही फ्लाइट मोडवर टाकून दिला. "काहीच झालेलं नाही, दादा सुरक्षित आहेत," असे आम्ही त्यांना सांगत होतो.


पण आशाताई कोणाचेही ऐकायला तयार नव्हत्या. "दादांना भेटून येऊ, चला," असे म्हणत त्या फार्महाऊसच्या बाहेर चालत निघाल्या. ड्रायव्हरने गाडी बंद पडल्याचे सांगितले, पण त्या ऐकल्या नाहीत. शेवटी नाईलाजाने आम्ही त्यांना बारामतीतील बंगल्यावर घेऊन गेलो. तिथे त्यांना सत्य समजले आणि त्यांचे डोळे भरून आले. या प्रसंगाने फार्महाऊसवरील प्रत्येकजण हादरून गेला. आशाताईंच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू आणि हा शोक पाहणाऱ्यांच्या काळजाला तडा गेला.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# काळाची झडप!



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याची बातमी राज्यासह देशासाठी धक्कादायक आहे. अजित पवार हे विमानाने मुंबईहून बारामती येथे जात होते; मात्र विमान उतरत असतांनाच ते एका शेतात कोसळले. यात अजित पवार यांच्यासह ६ जणांचा मृत्यू झाला. अजित पवार यांच्याप्रमाणेच भाजपचे नेते तथा तत्कालीन केंद्रीय मंत्री कै. गोपीनाथ मुंडे यांचाही वर्ष २०१४ मध्ये देहलीत रस्ते अपघातात असाच अकाली मृत्यू झाला होता. आजप्रमाणेच तेव्हाही सर्वांनाच धक्का बसला होता. अलीकडच्या काळातील वाढते विमान अपघात पहाता आतापर्यंत सर्वांत सुरक्षित मानली जाणारी हवाई वाहतूक सध्या अत्यंत बेभरवशाची का बनली आहे? असा प्रश्न पडतो. विमान किंवा हेलिकॉप्टर यांच्या अपघातांत प्राण गमवावे लागणार्‍या महनीय व्यक्तींची संख्या मोठी आहे. वर्ष १९८० मध्ये संजय गांधी यांच्यापासून अगदी अलीकडे, म्हणजे वर्ष २०२१ मध्ये सीडीएस बिपीन रावत, वर्ष २०२५ मध्ये गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी, अशी कितीतरी नावे सांगता येतील, ज्यांचा विमान किंवा हेलिकॉप्टर यांच्या अपघातात मृत्यू झाला आहे. अजित पवार यांचा राजकीय प्रवास बारामतीतूनच चालू झाला आणि ते राजकारणात असतांनाच त्यांचा बारामतीतच मृत्यू झाला. स्थानिक राजकारणापासून ते राज्याच्या उपमुख्यमंत्री पदापर्यंतचा त्यांचा राजकीय प्रवास त्यांचे राजकीय आणि सामाजिक कौशल्य अधोरेखित करणारा आहे. ६ वेळा राज्याचे उपमुख्यमंत्रीपद सांभाळण्याचा विक्रम राज्यात त्यांच्या नावावर आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेनंतर अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर खर्‍या अथार्ने पकड मिळवली. शरद पवार यांचे पुतणे असण्याचा त्यांना लाभ झाला; परंतु वक्तशीरपणा, रोखठोक बोलणे आणि निर्णयाची गतीमानता, यांमुळे त्यांनी राज्यात विशेषतः ग्रामीण भागांत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या रोखठोक बोलण्यामुळे आणि त्यात करड्या आवाजामुळे गमतीने त्यांचा उल्लेख 'कडक पत्ती चाय', असा केला जाई. प्रशासकीय अधिकारीही त्यांना घाबरत असत. त्यांच्या कामाची झलक सर्वप्रथम पिंपरी-चिंचवडमध्ये दिसली. आज जे पिंपरी-चिंचवड दिसत आहे, त्याचे श्रेय विरोधकही अजित पवार यांना देतांना दिसतात. पुढे पुणे महानगरपालिकेत त्यांनी काँग्रेसचे तत्कालीन नेते सुरेश कलमाडी यांच्यासमवेत काम केले; पण अजित पवार यांना काँग्रेसची काम करण्याची पद्धत कधी रूचली नाही. एवढेच काय त्यांच्याच पक्षाचे नेते तथा तत्कालीन गृहमंत्री आर.आर. पाटील यांच्याशीही त्यांचे कधी फारसे पटले नाही. पुढे कलमाडी यांना शह देण्यासाठी त्यांनी शिवसेना आणि भाजप यांच्यासमवेत हातमिळवणी करून पुणे महानगरपालिकेत सत्ता स्थापन केली. या तिन्ही पक्षांची आघाडी त्या काळी 'पुणे पॅटर्न' या नावाने गाजली. दुसरीकडे राज्याच्या राजकारणातही ते सत्ताधारी असल्यामुळे प्रत्येक गोष्टीत त्यांचाच वरचष्मा होता. राजकारणात सततची सत्ता आणि यश हे माणसाची दिशा चुकवण्यास कारणीभूत ठरू शकते. अजित पवारही त्यास अपवाद ठरले नाहीत. त्यांचे रोखठोक बोलणे पुढे अनेकदा त्यांच्या चांगलेच अंगलट आले. अनेक जण दुखावले जात. राज्याचे जलसंपदामंत्री असतांना त्यांच्यावर ७० सहस्र कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचा आरोप त्यांच्या राजकीय कारकीदीर्तील काळा डाग ठरला. अलीकडेपर्यंत राज्यात या सूत्रावरून त्यांच्यावर टीका केली जात होती. खरेतर अशा आरोपांची तात्काळ चौकशी होऊन जो काही सोक्षमोक्ष आहे, तो लावला जायला हवा. यात जो कुणी दोषी आहे किंवा नाही? याचा निवाडा न्यायालयात व्हायला हवा. दुर्दैवाने देशात असे तत्परतेने घडतांना दिसत नाही. पवार यांची राजकीय कारकीर्द डागाळणारी आणखी एक घटना म्हणजे त्यांचे धरणातील पाण्याविषयीचे विधान! यामुळे जनमानसातील त्यांच्या प्रतिमेला तडा गेला. त्यापाठोपाठ शरद पवार यांच्याशी बंड करून उरकलेल्या 'पहाटेच्या शपथविधी'वरूनही त्यांच्यावर टीकेची प्रचंड झोड उठली. 'राजकारणात सत्तेसाठी कुणीही, कधीही आणि कुणाशीही युती करू शकतो', हे तेव्हापासून ठळकपणे अधोरेखित झाले. पुढे त्यांनी शरद पवार यांच्यापासून अधिकृतपणे फारकत घेतली, तेव्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अध्यार्हून अधिक आमदार त्यांच्यासमवेत गेले. तेव्हापासून राज्याच्या राजकारणात त्यांचे राजकीय वजन पूर्वीपेक्षा अधिक वाढले. अलीकडच्या काळात त्यांच्या कार्यशैलीत त्यांनी आमूलाग्र पालट केल्याचे, तसेच त्यांच्या पूर्वीच्या विधानांतून धडा घेऊन स्वतःत पालट केल्याचे त्यांचे निकटवर्तीय आवर्जून सांगत असत. नुकत्याच झालेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत शरद पवार यांचा पाठिंबा नसतांना त्यांनी बर्‍यापैकी यश मिळवले. आताही जिल्हा पंचायतीच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी ते बारामती येथे जात असतांना त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्यानंतर आता पक्षाची धुरा कोण सांभाळणार? त्यांचा पक्ष यापुढे सत्तेत सहभागी असणार का? पक्षाचे शरद पवार यांच्या गटाशी पुन्हा सुर जुळणार का? यापुढची राजकीय गणिते काय असतील? आदी प्रश्नांची उत्तरे येणारा काळच देईल. विमान अपघातात भल्याभल्यांना हकनाक जीव गमवावा लागला आहे. अजित पवार हे ज्या विमानाने प्रवास करत होते, ते 'चार्टर्ड विमानां'च्या श्रेणीत लोकप्रिय मानले जाते. अतिशय आधुनिक सुविधांनी युक्त असलेल्या या विमानांचा अतीमहनीय व्यक्ती, उद्योगपती आदी मोठ्या प्रमाणात वापर करतात. तथापि एका आकडेवारीनुसार जगभरात या श्रेणीतील विमानांचे २०० हून अधिक अपघात झाले आहेत. त्यामुळे आज 'एआय'च्या अत्याधुनिक युगात अशा प्रकारच्या विमानांच्या रचनेत किंवा तांत्रिक गोष्टींत काही पालट केले गेले पाहिजेत का?, याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. ह्यखराब हवामानामुळे, थंडीत धुक्यामुळे आदी कारणांमुळे अपघात होतातह्न, असे सांगितले जाते; पण ते रोखण्यासाठी आजच्या आधुनिक काळात ठोस उपाययोजना काढायला हव्यात, जेणेकरून कुणाचेही असे हकनाक मृत्यू होणार नाहीत. सुरक्षिततेच्या संदर्भात आधुनिक तंत्रज्ञान आणि राजकीय इच्छाशक्ती यांचा समन्वय साधला गेला पाहिजे, अन्यथा आकाशातले धोके आणि भूमीवरचे प्रश्न दोन्ही तसेच रहातील!

# विमान अपघातांमुळे अनेक नेते काळाच्या पडद्याआड!

**विमान अपघातात बडे राजकीय नेते, कलाकार तसेच खेळाडूंचे निधन होणे हा एक चिंतेचा विषय आहे, असे वारंवार दिसून आलेले आहे. केवळ आपल्या भारतातच नाही तर जगभरात आतापर्यंत अनेक महत्त्वाच्या व्यक्तींचा विमान अपघातात मृत्यू झाला आहे. विमान प्रवास हा सर्वात वेगवान असला तरी या ना त्या कारणाने विमान अपघातात आतापर्यंत अनेकांचे जीव गेले आहेत. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यावर ठोस उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे.**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर विमान अपघातांचा विषय पुन्हा एकदा चर्चेत जरूर आला आहे. परंतु, केवळ उपमुख्यमंत्री अजित पवारच नाही तर त्यांच्याआधीही आपल्याकडे काही महत्त्वाचे राजकीय नेते, खेळाडू आणि सिनेकलाकारांसह अनेक महत्त्वाच्या व्यक्तींचे निधन विमान अपघातात झाल्याच्या कटू आठवणी आहेत. भारतात १९६५ सालापासून विमान दुर्घटनेत राजकीय नेत्यांचा मृत्यू झाल्याचा इतिहास आहे. गुजरातचे माजी मुख्यमंत्री बलवंतराय मेहता यांचाही १९६५ साली विमान प्रवासादरम्यानच अपघाती मृत्यू झाला होता. बलवंतराय मेहता हे १९६३ ते १९६५ पर्यंत गुजरातचे मुख्यमंत्री होते. १९६५ च्या युद्धादरम्यान बलवंतराय मेहता हे कच्छच्या रणात निरीक्षणासाठी विमानाद्वारे उड्डाण करत होते. परंतु, तांत्रिक बिघाडामुळे त्यांचे विमान भरकटले आणि पाकिस्तानच्या हवाई कक्षेत गेले.

संबंधित विमान संशयास्पदरित्या आपल्या प्रदेशात घिरट्या घालत असल्याचे आढळून येताच ते पाडल्याचा दावा पाकिस्तानकडून करण्यात आला. या दुर्घटनेत बलवंतराय मेहता यांच्यासह त्यांची पत्नी, तीन कर्मचारी, एक ज्येष्ठ पत्रकार आणि विमानातील दोन क्रू सदस्यांचादेखील मृत्यू झाला होता. बलवंतराय मेहता हे विमान अपघातात मृत्यू होणारे पहिले मोठे राजकीय नेते होते. बलवंतराय मेहता यांच्यानंतर १९८० साली दुसरी विमान दुर्घटना भारतात घडली. २३ जून १९८० रोजी काँग्रेसचे तत्कालीन खासदार संजय गांधी दिल्लीतून विमान प्रवासाला निघाले होते. पेशाने पायलट असणार्‍या संजय गांधी यांना विमान उडवण्याची प्रचंड आवड होती. २३ जून १९८० रोजी सकाळी १० वाजता विमान घेऊन उड्डाण केल्यानंतर चित्तथरारक कसरती दाखवताना त्यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला होता. संजय गांधी यांच्यासोबत त्यांचे सहप्रवासी सुभाष सक्सेना यांचाही त्यात मृत्यू झाला होता.

१९८० साली मध्य प्रदेशमधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माधवराव शिंदे यांचाही अवघ्या ५६ व्या वर्षी विमान अपघातातच मृत्यू झाला होता. ३० सप्टेंबर २००१ रोजी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माधवराव शिंदे हे निवडणूक प्रचारादरम्यान उत्तर प्रदेशातील कानपूर येथे जाहीर प्रचारसभेसाठी जात होते. परंतु, खराब हवामानामुळे उत्तर प्रदेशातील मैनपुरीजवळील मोटागाव येथे माधवराव शिंदे यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला होता. या अपघातात माधवराव शिंदे यांच्यासह अन्य काही नेते, तसेच विमानातील क्रू मेंबर्सचा जागीच मृत्यू झाला होता. ही घटना घडल्याच्या दुसर्‍याच वर्षी २००२ साली लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष जी.एम.सी. बालयोगी यांचादेखील एका विमान अपघातातच मृत्यू झाल्याची नोंद आहे.

जी.एम.सी. बालयोगी म्हणजेच गंती मोहना चंद्र बालयोगी यांचा मृत्यू लोकसभा अध्यक्षपदावर असताना झाला होता. २००२ मध्ये आंध्र प्रदेशातील एका कार्यक्रमासाठी जाताना त्यांचे हेलिकॉप्टर क्रॅश झाले होते. या अपघातात जी.एम.सी. बालयोगी यांचे सुरक्षा अधिकारी डी. सत्य राजू आणि पायलट कॅप्टन जी.व्ही. मेनन यांचाही मृत्यू झाला होता. सर्वात खळबळजनक म्हणजे या आंध्र प्रदेशातच आणखी एका भीषण हेलिकॉप्टर दुर्घटनेतच माजी मुख्यमंत्र्यांना आपला जीव गमवावा लागला होता. प्रसिद्ध भारतीय उद्योगपती आणि जिंदाल समूहाचे संस्थापक तसेच, हरियाणाचे तत्कालीन ऊजार्मंत्री ओ. पी. जिंदाल (ओम प्रकाश जिंदाल) यांचाही मृत्यू हेलिकॉप्टर दुर्घटनेतच झाला होता. ३१ मार्च २००५ रोजी उत्तर प्रदेशातील सहारनपूरजवळ तांत्रिक बिघाडामुळे त्यांचे हेलिकॉप्टर कोसळले आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला होता.

२००९ मध्ये मुख्यमंत्री वाय. एस. राजशेखर रेड्डी यांचा हेलिकॉप्टर अपघाताने बळी घेतला. सप्टेंबर २००९ मध्ये वाय. एस. राजशेखर रेड्डी हे काही शासकीय अधिकार्‍यांसह नल्लामाला या भागातून जात असताना त्यांचे हेलिकॉप्टर कोसळले. या दुर्घटनेत वाय. एस. राजशेखर रेड्डी यांच्यासह राज्याचे मुख्य सचिव आणि काही शासकीय अधिकार्‍यांचाही मृत्यू झाला होता. काही माध्यमांमध्ये नक्षलवाद्यांनी हे हेलिकॉप्टर पाडल्याचा दावा केला गेला, मात्र सरकारने तेव्हा हा दावा फेटाळला होता. हा परिसर नक्षलग्रस्त परिसर असल्याने येथे बचावकार्य राबवताना लष्कराची मदत घेण्यात आली होती. अपघातानंतरही बचावकार्याची मोहीम पार पाडण्यासाठी जवळपास आठवडाभराचा अवधी लागला होता. त्यांचा मृतदेह हाती लागल्यानंतरच वाय. एस. रेड्डी यांच्या मृत्यूची घोषणा करण्यात आली होती. वाय. एस. रेड्डी यांच्या निधनानंतर आंध्र प्रदेशमधील त्यांच्या काही समर्थकांनी आत्महत्याही केली होती.

अरुणाचल प्रदेशाचे माजी मुख्यमंत्री डोरजी खांडू यांचाही २०११ मध्ये विमान अपघातात मृत्यू झाला होता. डोरजी खांडू हेदेखील अवघे ५६ वर्षांचे होते. डोरजी खांडू हे तवांगहून अरुणाचल प्रदेशची राजधानी इटानगरकडे जात होते. तेव्हा त्यांचे विमान अचानक बेपत्ता झाल्याची बातमी आली. परंतु, काही वेळानंतर खराब हवामानामुळे त्यांच्या विमानाचा भीषण अपघात घडल्याची माहिती समोर आली आणि त्यात डोरजी खांडू यांच्यासमवेत काही जणांचा मृत्यू झाल्याचे धक्कादायक वृत्त समोर आले. नुकत्याच जवळपास गेल्या ७ महिन्यांपूर्वी घडलेल्या भीषण विमान दुर्घटनेने केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात खळबळ उडाली होती. १२ जून २०२५ रोजी अहमदाबादहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान उड्डाण केल्यानंतर अवघ्या काही क्षणांतच कोसळले.

अहमदाबादमधील एका वैद्यकीय महाविद्यालयाच्या हॉस्टेलवर हे विमान कोसळून जवळपास २५० प्रवाशांचा मृत्यू झाला. या विमानातून गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी हेदेखील प्रवास करत होते. विजय रुपाणी आपल्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी लंडनला जात होते. परंतु, या विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला होता. २०२१ मध्ये तिन्ही सैन्य दलाचे प्रमुख (सीडीएस) बिपीनसिंह रावत यांचाही मृत्यू हेलिकॉप्टर अपघातातच झाला होता. बिपीन रावत यांच्याप्रमाणेच भारतीय लष्कराचे निवृत्त ले. जमील मोहम्मद यांचाही १९९३ साली हेलिकॉप्टर अपघातातच मृत्यू झाला होता. १९८५ साली ज्येष्ठ शास्त्रज्ञ येल्लावर्थी नायूडूम्मा हेदेखील विमान अपघातातच मृत्यूमुखी पडले. अभिनेत्री सौंदर्या ही गर्भवती असताना तिचाही २००४ साली विमान अपघातातच मृत्यू झाला होता. यासोबतच १४ वर्षीय अभिनेत्री तरुणी सचदेव हिचादेखील नेपाळमध्ये विमान अपघातातच मृत्यू झाला.

विमान अपघातात अनेक जणांनी जीव गमावल्यानंतरही आपल्याकडील यंत्रणा अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सजग झाल्या नाहीत. तांत्रिक बिघाड, उड्डाणादरम्यान पक्ष्यांची धडक, खराब वातावरण आदी कारणे विमान अपघातासाठी जबाबदार धरली जातात. परंतु, कारणे अनेक असली तरी विमान अपघातांमुळे अनेकांचे मृत्यू होणे हे जीवाला चटका लावणारे असते, असाच अनुभव आतापर्यंत अनेकांचा आहे. सर्वसाधारणपणे विमान प्रवास हा रेल्वे, बस, खासगी वाहने आदींच्या तुलनेत सर्वात खर्चिक, जलद, अधिक वेगवान आणि सर्वात आरामदायी मानला जातो. परंतु, हे सर्व असले तरी या प्रवासादरम्यान सुरक्षेची तितकी हमी नाही, हेदेखील खरे आहे. एक जराशी चूकही अनेकांचे जीव घेणारी ठरते. खासगी असो वा प्रवासी विमान अथवा हेलिकॉप्टर यातून प्रवास करताना सुरक्षेची काळजी घेणे अधिक आवश्यक बनून गेले आहे. विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेदेखील अनेकदा हेलिकॉप्टर अपघातातून बचावले आहेत. याबाबत अनेकदा वृत्त प्रसिद्ध झाले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विमानाचेदेखील खराब हवामानामुळे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. १० ऑगस्ट २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हेलिकॉप्टर पाऊस आणि दाट धुक्यामुळे भरकटले होते. सातार्‍यातील त्यांच्या दरे या मूळ गावी जाताना पाऊस आणि दाट धुक्यांमुळे हेलिकॉप्टर उतरवणे शक्य झाले नाही. त्यामुळे एकनाथ शिंदेंना घेऊन हेलिकॉप्टर पुन्हा मुंबईच्या दिशेने परत फिरले होते. मुंबईमध्ये हेलिकॉप्टरचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले होते. त्यानंतर हवामान सुधारल्यानंतर पुन्हा हेलिकॉप्टर सातार्‍याच्या दिशेने रवाना झाले होते. एकंदरीतच या सर्व घटना पाहता विमान, हेलिकॉप्टर अपघात हा काही अलीकडचा विषय नसून त्याचा इतिहास जुनाच आहे. परंतु, अशा गोष्टी घडू नयेत म्हणून यापुढे तरी उपाययोजना कराव्याच लागतील. अन्यथा, या दुर्घटनांचे प्रमाण थांबणार नाही आणि अशा घटनांमध्ये जग सोडून जाणार्‍यांचे वृत्त ऐकून मनाला वेदना होतच राहतील.

# शब्दाला जागणारा नेता

**महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार हे नाव साडेतीन दशके सातत्याने चर्चेत राहिले. लोकसभेची अल्पकालीन कारकीर्द वगळता ते सातत्याने बारामती मतदारसंघातून निवडून आले. विकासाची दूरदृष्टी, परखड, स्पष्टवक्ता, प्रशासनावर पकड आणि राज्याच्या प्रश्नांची जाण असलेल्या अजितदादांचे विमान अपघातात निधन झाले. बारामतीचा विकास पाहता आमदार कसा असावा, याचे ते ज्वलंत उदाहरण होते.**



शरद पवार यांचे पुतणे म्हणून राजकारणात प्रवेश करणारे अजित पवार केवळ त्यांच्या वारशावर उभे राहिले नाहीत, तर स्वतःची वेगळी ओळख, शैली आणि ताकद निर्माण करून गेले. स्पष्टवक्तेपणा, आक्रमक निर्णयक्षमता आणि प्रशासकीय अनुभव यामुळे ते समर्थकांसाठी 'कामाचा नेता' होते. अजित पवार म्हणजे एक कडक प्रशासक, वित्तीय शिस्तीचा आग्रह धरणारा आणि निर्णय घेताना फारसा भावनिक न होणारा नेता अशी त्यांची ओळख. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक वेळा राज्याचा अर्थसंकल्प हाताळला. सिंचन, पाणीवाटप, कृषी अर्थकारण आणि पायाभूत सुविधा हे त्यांचे मुख्य कार्यक्षेत्र राहिले. ग्रामीण महाराष्ट्रात, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात त्यांचा मोठा प्रभाव राहिला. २०१९ मधील पहाटेच्या शपथविधीपासून नंतरच्या राजकीय घडामोडींपर्यंत त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये परतणे आणि नंतर पक्षातच फूट पाडत वेगळ्या गटासह सत्तेत सहभागी होणे, या घटनांनी त्यांच्या राजकारणातील व्यवहार्य आणि सत्ताकेंद्रित दृष्टिकोन अधोरेखित केला. समर्थकांच्या मते अजित पवार हे वास्तववादी राजकारणी होते. 'सत्तेत राहिल्याशिवाय काम करता येत नाही' हा त्यांचा अप्रत्यक्ष संदेश अनेकांना व्यवहार्य वाटल्यामुळेच अनेक आमदार, नेते आणि कार्यकर्ते त्यांच्या मागे ठामपणे उभे राहिले.

अजित पवार यांचे नेतृत्व हे करिष्म्यापेक्षा नियंत्रणावर आधारित होते. ते भावनिक भाषणांपेक्षा आकडेवारी, योजना आणि निधी यांवर अधिक भर देत. अधिकारी वर्गावर पकड ठेवणे, निर्णयांची अंमलबजावणी करून घेणे आणि विरोधाला थेट सामोरे जाणे ही त्यांची शैली होती. अजित दादा हे महाराष्ट्राच्या राजकारणातील दुर्लक्ष करता न येणारे व्यक्तिमत्त्व. घेतलेले निर्णय, उचललेली पावले आणि निर्माण केलेले वाद यामुळे ते नेहमीच चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. स्पष्टवक्तेपणा, कठोर प्रशासकीय भूमिका आणि आक्रमक राजकारण यासाठी ओळखले जाणारे अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून अनेक वेळा जबाबदारी सांभाळली. वित्त खाते, नियोजन विभाग यांसारखी महत्त्वाची खाती त्यांनी हाताळली. अर्थसंकल्पीय बाबींवरील प्रभुत्व आणि आकडेवारीवरील पकड यामुळे ते एक कुशल प्रशासक म्हणून ओळखले जात. त्यांची कार्यशैली अत्यंत शिस्तप्रिय आणि कधी कधी कठोर मानली जाते. कामात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा त्यांना सहन व्हायचा नाही. अधिकार्‍यांना थेट सूचना देणे, वेळेवर निर्णय घेणे आणि कामाचा पाठपुरावा करणे हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य. पाणी व्यवस्थापन आणि सिंचन क्षेत्र हे अजित पवार यांच्या राजकारणातील महत्त्वाचे विषय राहिले. दुष्काळी भागासाठी पाणी उपलब्ध करून देणे, कालवे, धरणे आणि सिंचन प्रकल्प राबवणे यावर त्यांनी विशेष भर दिला. काही प्रकल्पांवरून त्यांच्यावर टीकाही झाली, चौकशी झाली; मात्र त्यांनी नेहमीच आपण घेतलेले निर्णय विकासासाठीच होते, अशी भूमिका मांडली. अजित पवार यांच्या वाट्याला राजकारणातील चढउतार आले. पक्षांतर्गत मतभेद, सत्तास्थापनेदरम्यान घेतलेले धक्कादायक निर्णय तसेच राजकीय भूमिका बदल यामुळे ते कायम चर्चेत राहिले. लोकसभा, विधानसभेत किंवा सार्वजनिक सभांमध्ये मुद्देसूद आणि थेट भाषेत बोलत. अलंकारिक भाषेपेक्षा वास्तववादी आणि कधीकधी बोचर्‍या शब्दांचा वापर ही त्यांची खरी ओळख. ग्रामीण भागातील जनतेला ही शैली आपलीशी वाटते. सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या बाबतीत अजित पवार यांचा दृष्टिकोन प्रामुख्याने व्यवहार्य राहिला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर शरद पवार यांच्या राजकीय शिस्तीचा आणि दूरदृष्टीचा प्रभाव होता; मात्र अजित पवार यांनी स्वतःची स्वतंत्र, आक्रमक आणि कधी कधी बंडखोर अशी प्रतिमा निर्माण केली.

सत्तेत असो वा विरोधात; अजितदादांची भूमिका नेहमीच प्रभावी राहिली. अजित पवार हे कार्यक्षम, परंपरागत राजकारणापेक्षा वेगळा मार्ग स्वीकारणारे नेते होते. स्पष्टवक्तेपणा, निर्णयक्षमता, कठोर प्रशासकीय भूमिका आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळे अजित पवार यांची ओळख एक कठोर प्रशासक नेता अशी निर्माण झाली. ते केवळ राजकारणी नसून एक कार्यक्षम प्रशासक म्हणूनही ओळखले गेले. अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे पुतणे होते; मात्र त्यांनी केवळ घराणेशाहीच्या जोरावर राजकारणात स्थान मिळवले, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, जलसंपदा मंत्री अशा महत्त्वाच्या जबाबदार्‍या त्यांनी अनेक वेळा समर्थपणे सांभाळल्या. अधिकारी वर्गाला थेट प्रश्न विचारणे, वेळेची काटेकोर अंमलबजावणी करणे आणि निकालाभिमुख प्रशासन यावर त्यांचा भर असायचा. अनेक वेळा त्यांच्या भाषेतील रोखठोकपणा चर्चेचा विषय ठरायचा; मात्र काम लवकर आणि प्रभावीपणे पूर्ण व्हावे, हाच त्यामागील उद्देश असायचा.

जलसंपदा मंत्री असताना त्यांनी अनेक सिंचन प्रकल्पांना गती दिली. अवघड परिस्थितीतही निर्णय घेण्याची त्यांची तयारी असायची. राजकीय धाडस, सत्ता संतुलनाचे भान आणि प्रसंगी आक्रमक भूमिका घेण्याची क्षमता यामुळे ते वेगळे ठरले. महाराष्ट्राचे अर्थमंत्री म्हणून सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. त्यांनी राज्याच्या आर्थिक नियोजनात शिस्त आणण्याचा प्रयत्न केला. अर्थसंकल्प मांडताना वास्तववादी आकडे, विकासावर भर आणि वित्तीय शिस्त यांचा समतोल साधण्याचा त्यांचा दृष्टिकोन दिसून आला.

कठोर प्रशासक असूनही अजितदादांनी जनतेशी थेट संवाद साधण्यावर भर दिला. दौरे, आढावा बैठक, प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी यामुळे ते जमिनीवरील वास्तव जाणून घेत. बारामती मतदारसंघातील विकासकामे हे दादांच्या कार्यक्षम प्रशासनाचे उदाहरण मानले गेले. ते लोकप्रियतेपेक्षा कार्यक्षमतेला प्राधान्य देत. त्यांच्या मते, प्रशासन हे शिस्त, वेग आणि निर्णयांवर चालते. त्यामुळेच त्यांना 'कठोर पण कार्यक्षम प्रशासक' अशी ओळख मिळाली. त्यांच्या कार्यशैलीवर टीका होत असली, तरी राज्याच्या प्रशासनात गती, शिस्त आणि विकासाचा दृष्टिकोन रुजवण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. आता मात्र ही सर्व चर्चा थांबणार आहे. राज्यातील जनता नेहमीच त्यांना आठवणींमध्ये जपणार आहे.

# दिलखुलास दादा!

शरद पवार ८० च्या दशकात महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावत होते. पवार कुटुंबातील इतर कोणीही सदस्य राजकारणात सक्रिय नव्हते. तेव्हा १९८२ पासून २३ वर्षांचा एक युवक थोरल्या पवारांच्या आजूबाजूला घिरट्या घालत होता. हा युवक पुढे महाराष्ट्राच्या राजकारणातील 'दादा' होईल, याचा कुणालाही अंदाज नव्हता. मात्र, को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरी बोर्ड सदस्य असतानाच १९९१ मध्ये या तरुणाने थेट संसदेत प्रवेश केला. तेव्हापासून महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर अजित पवार नावाचा तारा चमकू लागला. ती चमक अगदी २८ जानेवारीच्या सूर्योदयापर्यंत कायम होती. बारामतीमध्ये विमान उतरताना दुर्घटना घडली आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांसह पाच जणांचा बळी गेला. या घटनेमुळे महाराष्ट्र सुन्न झाला. इतका धडाडीचा नेता आपल्यातून अचानक जातो, यावर विश्वास ठेवणे अजूनही शक्य होत नाही. मात्र, वास्तव स्वीकारणे भाग आहे. अत्यंत वक्तशीर असलेल्या अजित पवारांनी वेळेच्या आधीच एक्झिट घेतल्याची प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहे. काका शरद पवारांचे बोट पकडून अजित पवार बारामतीमधून राजकारणात शिरले आणि त्याच भूमीत त्यांना अखेरची विश्रांती मिळावी, हा निव्वळ योगायोग की नियतीचे काही संकेत म्हणायचे? तरीही नियतीचे संकेत म्हणता येणार नाहीत, कारण अजित पवार शिव-शाहू-फुले आणि आंबेडकरी विचारांवर चालणारे पुरोगामी नेते होते. त्यांनी कधीही जातीय राजकारण केले नाही. कधीही हाताला गंडे, दोरे बांधले नाहीत. कामाला देव मानले आणि अखंड कामात व्यग्र राहिले. महाराष्ट्राच्या राजकीय मुशीत तयार झालेल्या नेत्यांमध्ये अजित पवारांचा बाज अगदी निराळा होता. ते अजित पवारांचे 'अजितदादा' बनले. त्यानंतर दादा म्हणून लोकप्रिय झाले. तरीही ते रुढाथार्ने दादा नव्हते. कामात वाघ, बोलण्यात दरारा आणि मिश्किल स्वभाव ही त्यांची ओळख होती. आत एक आणि बाहेर एक, असा त्यांचा स्वभाव नव्हता. त्यामुळे जे काही आहे ते अजितदादा तोंडावर रोखठोक बोलायचे. त्यांचा स्वभाव सर्वांना ठाऊक असल्यामुळे अजितदादा कितीही चिडले तरी काही क्षणातच त्यांचा स्वर समजावणीचा व्हायचा आणि समोरचा माणूस त्यांच्या प्रेमात पडायचा. रांगडा स्वभाव, रांगडी बोली तरीही मनमिळावू स्वभावामुळे अजित पवारांना कुणीही विरोध केला तरी तो दीर्घकाळ टिकत नसे. शिवाय काम करण्याची आणि काम करून घेण्याची त्यांची हातोटी यामुळे प्रशासनावर त्यांची जरब होती. अनेकदा प्रशासनातले अधिकारी मंत्र्याला गुंडाळण्यात वाकबदार असतात. मात्र, अजित पवार पूर्ण तयारीनिशी येत असल्यामुळे त्यांना गुंडाळणे शक्य होत नसे. त्यामुळे अजित पवारांचाच प्रशासनावर वचक दिसायचा. अजितदादा पहाटे उठायचे. अनेकदा ते भेटायला येणाऱ्यांना सकाळी सहाची अपॉईंटमेंट द्यायचे. कुणाला भेटायची वेळ दिली की ती ते काटेकोरपणे पाळायचे. शिवाय दिलेल्या वेळेआधीच ते हजर असायचे. वक्तशीरपणा त्यांच्या रक्तात भिनला होता. मुंबईत, इतरत्र किंवा पुण्यातही मेट्रोची किंवा इतर कामांची पाहणी करण्यासाठी ते सकाळी लवकर जायचे. त्यामुळे अधिकारीही त्यांना वचकून राहात होते. अजित पवार यांचा हा गुण राजकारणात विरळाच होता. कामात त्यांना वाघ म्हटले जायचे, कारण त्यांच्याकडे जे खाते असायचे त्याचा ते प्रचंड अभ्यास करायचे. राज्याचा अर्थसंकल्प त्यांनी ११ वेळा मांडला. यावरून त्यांच्या अर्थ खात्याच्या आकलनाची कल्पना येते. शिवाय सिंचन, ग्रामविकास, बांधकाम आदी क्षेत्रांचेही त्यांना खूप चांगले ज्ञान होते. मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठीही ते तयारी करून जायचे. त्यामुळे मोठमोठे अधिकारीही त्यांना जरा टरकून असत. अजित पवार तब्बल सहावेळा उपमुख्यमंत्री होते. त्यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हायचे होते, आणि हे त्यांनी बोलूनही दाखवले होते. मात्र, त्यांच्या पदातून 'उप' कधीच निघाला नाही, याची खंत अजित पवार यांना कायम सलत राहिली. वास्तविक २००४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला 71 आणि काँग्रेसला ६९ जागा मिळाल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसला मुख्यमंत्रीपद मिळणे अपेक्षित होते. त्यावेळी अजित पवारांची राजकीय कारकीर्द १३ वर्षांची होती. त्यामुळे अजित पवार मुख्यमंत्री बनणार अशी चर्चा होती. मात्र, काँग्रेसचे विलासराव देशमुख मुख्यमंत्री बनले आणि अजित पवारांची ती संधी चुकली ती कायमचीच! त्यानंतर त्यांना कायम मुख्यमंत्रीपदाने हुलकावणी दिली. शिवाय सिंचन घोटाळ्याचा डाग ते पुसू शकले नाहीत, याचेही शल्य त्यांना होते. १९९१ मध्ये ते पूर्णवेळ राजकारणात आल्यानंतर थेट खासदार बनले. मात्र, त्यांचे मन दिल्लीत रमले नाही. त्यामुळे चार-महिन्यांतच ते महाराष्ट्रात आले आणि बारामती मतदारसंघातून विधानसभेत गेले. तेव्हापासून सलग आठवेळा ते विधिमंडळात आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस असा प्रवास करत २०२२ मध्ये त्यांनी काही आमदार घेऊन ते शरद पवारांच्या राजकारणापासून वेगळे झाले आणि सत्तेत सहभागी झाले. त्यानंतरही त्यांच्या स्वभावात बदल झाला नाही. स्वतःला झोकून देत ते काम करत होते. त्यांच्या स्वभावातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे रोखठोक बोलणे! एखादे काम होणार नसेल तर ते नाही सांगायचे. नंतर पाहतो, करतो असे थातूरमाथूर बोलून वेळकाढूपणा करत नसत. त्यांनी एखाद्या कागदपत्रावर स्वाक्षरी केली म्हणजे ते काम होणारच, यात कुणालाही शंका वाटत नव्हती. नेतृत्व आणि वक्तृत्व यात ते वाकबदार होते. थापेबाजी त्यांना जमत नव्हती. म्हणूनच दादांना जनमानसात स्थान होते. म्हणूनच ते लोकनेते होते, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. अजित पवारांची राजकारणातील उणीव कायम राहील. खासदार संजय राऊत यांनी या संदर्भात अत्यंत बोलकी प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवारांशिवाय महाराष्ट्रातील राजकारण बेचव आणि अळणी होईल, याची प्रचिती लवकरच येईल.

# उकडवून स्वादिष्ट कॉर्न बॉल्स बनवा

स्वीट कॉर्नपासून अनेक प्रकारचे पदार्थ बनवता येतात. लोकांना भुट्टा देखील आवडतो आणि तो आरोग्यासाठी देखील फायदेशीर ठरू शकतो. स्वीट कॉर्न चवीला काहीसा गोड असतो. ते उकडवून खाऊ शकता किंवा काही स्नॅक्स देखील बनवू शकता. थाई स्वीट कॉर्न रेसिपी देखील बनवू शकता. ही रेसिपी करायला खूप सोपी आहे. चला तर मग साहित्य आणि कृती जाणून घेऊ या.

**साहित्य :** कणीस, लेमन ग्रास (लेमन ग्रासचे भारतीय नाव), लिंबाचा रस, बेकिंग पावडर, काळी मिरी, करी पेस्ट, नारळ पावडर, कॉर्न फ्लोअर आणि मीठ.

**पाककृती :** वाफवलेले कॉर्न बॉल्स बनवण्यासाठी कॉर्न पाच मिनिटे उकडवा. आता कॉर्नमधील पाणी पिळून घ्या. नंतर उकडलेले कॉर्न ग्राइंडरमध्ये बारीक करून पेस्ट तयार करा. या कॉर्न पेस्टमध्ये नारळाची दूध पावडर, चिरलेला लेमनग्रास, लिंबाचा रस, हिरवी करी पेस्ट, कॉर्नफ्लोअर, बेकिंग पावडर, काळी मिरी पावडर आणि मीठ घाला.

सर्व साहित्य चांगले मिसळा आणि या मिश्रणाचे छोटे गोळे बनवा. कॉर्न बॉल्स स्टीमरमध्ये १०-१२ मिनिटे शिजवा. स्टीम कॉर्न बॉल्स तयार आहेत. चटणीसोबत सर्व्ह करा.



# या '3' घरगुती फ्रूट मास्कने करा सनटॅनच्या समस्येला अलविदा!

उन्हात काळवंडलेली त्वचा पुन्हा तजेलदार करण्यासाठी ब्युटीपार्लरच्या ट्रीटमेंटपेक्षा करा हे घरगुती उपाय. वीकेंडला घरच्या घरी काही फळांच्या मदतीने त्वचा (exfoliate) मोकळी करून सौंदर्य खुलवण्यासाठी कॉस्मोलॉजिस्ट यांनी सुचवलेले हे काही उपाय नक्की अजामावून पाहा.



### कलिंगड आणि काकडीचा मास्क

कलिंगडामध्ये पाण्याचा अंश अधिक असतो. त्यामुळे त्वचा मऊ आणि तजेलदार राहण्यास मदत होते. काकडीमध्ये पाणी मुबलक असल्याप्रमाणेच ब्लिचिंग क्षमताही आढळते. यामुळे टॅन कमी करण्यास आणि त्वचेचा रंग हलका करण्यास मदत होते.

**कसा बनवाल**

▮कलिंगड आणि काकडीचा पल्प एकत्र करा. तयार मिश्रण चेहऱ्यावर लावा.

▮rq मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करा.

### पीच आणि टोमॅटोचा मास्क

पीचमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. यामुळे त्वचेचे पोषण होते. पीचमधील मॉईश्चरायझिंग घटक आणि टोमॅटोमधील क्लिन्जिंक करण्याचे गुणधर्म त्वचेला अधिक तजेलदार बनवते.

**कसा कराल हा पॅक**

▮एक पीच आणि टोमॅटो यांची एकत्र पेस्ट करावी.

▮यामध्ये एक चमचाभर मध मिसळा.

▮तयार मिश्रण चेहऱ्यावर लावावे. त्यानंतर अर्ध्या तासाने चेहरा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा.

▮अशा घरगुती मास्कचा नियमित आणि योग्य पद्धतीने वापर केल्यास त्वचा अधिक तजेलदार होण्यास मदत होते. टॅन काढण्यासोबतच सौंदर्य खुलवण्यास या मास्कचा उपयोग होतो.

### ॲव्हॅकॅडो आणि पपई

ॲव्हॅकॅडोमध्ये व्हिटॅमिन ई घटक मुबलक असल्याने त्वचा आरोग्यदायी राहण्यास तसेच उजळण्यास मदत होते. पपई टॅन कमी करण्यास मदत करते. तसेच व्हिटॅमिन ए घटक त्वचेला पोषण देतात.

**कसा बनवाल मास्क**

▮एका मोठ्या वाटीमध्ये चार टीस्पून ॲव्हॅकॅडोची पेस्ट आणि पपईची पेस्ट मिसळा.

▮त्यामध्ये १ टीस्पून बदामाचे तेल आणि ३-४ थेंब ylang-ylang essential oil मिसळा.

▮या पॅकने चेहऱ्यावर आणि मानेवर मसाज करा. हा मास्क ५-१० मिनिटे ठेवा.

▮त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. थोड्या वेळाने चेहरा सुती कापडाने कोरडा करा. त्यानंतर चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावा.

▮हा उपाय नियमित करा.





# केवळ स्वाद नव्हे तर गुणांनीही परिपूर्ण उसाचा रस

**उन्हाळ्याची** काहिली आता चांगलीच जाणवू लागली आहे आणि त्यामुळे साहजिकच लोकांची पावले आईस्क्रीम पार्लर, थंड पेये विकणाऱ्या दुकानांकडे वळू लागली आहेत. त्यातच उसाच्या गुऱ्हाळांनी म्हणजे रसवंतीगृहांनी त्यांचे संसार सुरू केले असून थंडगार, स्वादिष्ट आणि आले-लिंबू घालून केलेला गारेगार रस पिण्यासाठी गर्दी होऊ लागली आहे.

उसापासून मिळणारा हा नैसर्गिक रस केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहे. अँटीऑक्सिडंटनी समृद्ध असा हा रस रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारा आहे. आयर्न, मॅग्नेशियम, कॅल्शियम व अन्य इलेक्ट्रोलाईट्सचे प्रमाण या रसात पुरेसे असते, त्यामुळे डीहायड्रेशन झालेल्यांना रस पिणे फार उपयुक्त ठरते. सर्वसामान्य सर्दी आणि अन्य किरकोळ साथीचे आजार रोखण्यास रस पिणे फायद्याचे आहे तसेच ताप उतरवण्यासाठी सुद्धा रस पिण्याचा उपयोग होतो कारण उसाचा रस शरीरात प्रोटीनची पातळी वाढवितो.



उसाच्या रसात कर्बोदके, प्रथिने, शिवाय आयर्न, पोटॅशियम अधिक मात्रेत असते यामुळे एक ग्लास उसाचा रस शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवितो आणि शरीराचा थकवा दूर करतो. रक्तातील प्लाझ्मा आणि अन्य तरल पदार्थ वाढवितो. मूत्रपिंडाच्या विकारात म्हणजे किडनी स्टोनमध्ये रस पिणे फायद्याचे आहे. तसेच हा रस दात किडणे आणि श्वास दुर्गंधी रोखणारा आहे. यकृत म्हणजे लिव्हरला बळ देणारा असल्याने कावीळ झाल्यास उसाचा रस द्यावा, असे सांगितले जाते. आयुर्वेदानुसार उसाच्या रसाचे सेवन बद्धकोष्ठता दूर करणारे आहे आणि रसात असलेल्या क्षारांमुळे पित्त, पोटातील जळजळ दूर होते. उसाच्या रसात ए तसेच सर्व प्रकारची बी व्हिटॅमिन्स असतात, म्हणूनही उसाचा रस आरोग्यवर्धक ठरतो. फक्त रसवंतीगृहात रस पिताना उघड्यावरच बर्फ घालणे टाळावे तसेच रसवंतीगृहाची तेथील ग्लास, रस पिळणारे चरक यांची स्वच्छता आहे याची खात्री करून घ्यावी.

# पासवर्ड आठवतच नाहीये? काळजी नको, पासवर्डशिवाय अनलॉक करा मोबाईल, पाहा ट्रिक्स

**सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रत्येकजण स्मार्टफोनला लॉक ठेवतो. फोनमध्ये अनेक वैयक्तिक आणि महत्त्वाच्या गोष्टी सेव्ह असतात. या गोष्टी कोणी पाहू नयेत, अशी युजर्सची इच्छा असते. यामुळेच मोबाईल लॉक करणे ही पयार्यापेक्षा गरज बनली आहे. पण जर तुम्ही तुमचा पासकोड विसरलात तर? तुमचा सर्व डेटा देखील करप्ट होऊ शकतो. विसरलेला पासकोड परत मिळवणे अनेकांसाठी कठीण असते. ही समस्या तुम्ही आधीच सोडवली तर बरे. आज आम्ही तुम्हाला अशा पद्धतीबद्दल सांगत आहोत, ज्याद्वारे तुम्ही पासवर्ड न टाकता तुमचा फोन अनलॉक करू शकता. परंतु, पिन किंवा पासवर्ड सेट करण्यापूर्वी तुम्हाला ही पद्धत करावी लागेल.**

**स्मार्ट लॉकसह अनलॉक करा :** हे एक अँड्रॉईड फीचर आहे, जे तुम्हाला काही विशिष्ट परिस्थितींमध्ये लॉक स्क्रीन सुरक्षिततेला बायपास करण्याची परवानगी देते. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जाऊन सिक्युरिटीमध्ये जावे लागेल. यानंतर तुम्हाला स्मार्ट लॉकमध्ये जावे लागेल. तो तुमचा फोन लॉक लक्षात ठेवेल. पिन सेट करण्यापूर्वी हे करणे आवश्यक असेल.

**ऑन-बॉडी डिटेक्शन :** येथे तुम्हाला ऑन-बॉडी डिटेक्शनसह पासवर्डशिवाय तुमचे विद्यमान लॉक अनलॉक करण्यासाठी ५ पर्याय दिले जातील. यामध्ये तुम्ही फोन हातात घेतला आहे की नाही हे फोनला कळेल. फोन तुमच्या हातात किंवा खिशात असल्यास फोन आपोआप अनलॉक होईल.



**विश्वसनीय ठिकाणे :** तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल असे स्थान तुम्ही निवडू शकता.

**विश्वसनीय उपकरणे :** विश्वासार्ह फिटनेस ट्रॅकर किंवा कारसारख्या अन्य ब्लूटूथ उपकरणाशी कनेक्ट केल्यावर तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल.

**विश्वासार्ह चेहरा :** फोन अनलॉक करण्यासाठी फेशियल रेकग्निशन वापरा.

**व्हॉइस मॅच :** तुमचा फोन तुमचा आवाज ओळखताच, तो तुमचा फोन अनलॉक करेल. हे वैशिष्ट्य अँड्राइड ८ ओरियो नंतर बंद करण्यात आले होते परंतु ते अद्याप जुन्या उपकरणांवर काम करते.

# ग्रीन कॉफीदेखील आरोग्यासाठी लाभदायक

**सकाळी** उठल्यावर वाफाळत्या कॉफीचा कप कोणाला नकोसा असेल? विशेषतः थंडीमध्ये किंवा पावसाच्या दिवसांमध्ये कॉफी मिळाली की मोसमाचा आनंद आणखीनच वाढतो, आणि शरीराची मरगळ दूर होऊन शरीरामध्ये नवे चैतन्य येते. पण केवळ शरीराची मरगळ दूर करणे आणि शरीरामध्ये चैतन्य निर्माण करणे एवढ्यापुरताच कॉफीचा उपयोग नाही. कॉफीचे सेवन आपल्या आरोग्याच्या दृष्टीने देखील फायद्याचे ठरण्यासाठी ग्रीन टीप्रमाणेच ग्रीन कॉफीचे सेवन करणे गरजेचे आहे. कॉफीच्या बिया भाजण्याच्या आधी हिरव्या असतात. याच बियांपासून तयार केली गेलेली कॉफी आरोग्यासाठी उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. ही कॉफी आरोग्याच्या दृष्टीने कशाप्रकारे उपयोगी आहे हे जाणून घेऊ या.

ग्रीन कॉफीमध्ये कॅफीनचे प्रमाण कमी असते. तसेच यामध्ये असलेले क्लोरोजेनिक ॲसिड वजन घटविण्यास सहाय्यक आहे. या तत्त्वामुळे शरीराच्या चयापचय शक्तीला चालना मिळत असून, शरीरातील ब्लड शुगर लेव्हल नियंत्रित राहण्यास मदत होते. शरीरातील साठून राहिलेले ग्लुकोज आणि चरबीचे प्रमाण या कॉफीच्या सेवनाने कमी होऊ लागते. त्यामुळेच संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांच्या जोडीने ग्रीन कॉफीचे सेवन वजन घटविण्याच्या दृष्टीने फायद्याचे ठरते. क्लोरोजेनिक ॲसिडमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असून यामध्ये सोडियमचे प्रमाण कमी असते. यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. त्याचप्रमाणे ग्रीन कॉफीच्या बिया कच्च्या आणि कोणत्याही प्रक्रिया केलेल्या नसल्यामुळे यांच्यामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण अधिक असते. म्हणूनच ग्रीन कॉफीच्या सेवनाने शरीरावर हानीकारक फ्री रॅडिकल्सचा प्रभाव कमी होतो. तसेच ग्रीन कॉफीमध्ये असणारे राहिडिक ॲसिड त्वचेला आर्द्रता प्रदान करणारे आहे.



# नाश्त्यामध्ये ब्रेड, कॉर्नफ्लेक्स खाणे शरीरासाठी हानीकारक

**सकाळच्या** नाश्त्यामध्ये अधिक जणांना ब्रेड, कॉर्नफ्लेक्स आणि अनेक तळलेले पदार्थ खाण्याची सवय असते. मात्र हे पदार्थ फुफ्फुसाच्या कॅन्सरला कारणीभूत ठरत असल्याचे नव्या संशोधनात समोर आलेय. व्हाईट ब्रेड, कॉर्नफ्लेक्स असे ग्लायसेमिक इंडेक्सयुक्त पदार्थ खाल्ल्याने फुफ्फुसाचा कॅन्सर वाढण्याची शक्यता असते. संशोधनादरम्यान ज्यांना हा आ-जार झाला होता अशा एक हजार ९०५ जणांना समाविष्ट केले होते. त्याचबरोबर दोन हजार ४१३ स्वस्थ व्यक्तींचेही निरीक्षण करण्यात आले. यादरम्यान त्यांच्या आहाराच्या सवयी जाणून घेतल्या. शोधकर्त्यांचे म्हणणे आहे की तंबाखू तसेच धूम्रपान न करणाऱ्या लोकांमध्येही फुफ्फुसाच्या कॅन्सरची लक्षणे आढळली. ज्यावरून त्यांच्या आहाराच्या सवयी या कॅन्सरसाठी कारणीभूत असल्याची शक्यता आहे.



# शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले असेल तर या नॅचरल ड्रिंक्सने बॉडीला करा डिटॉक्स

**योग्य खानपान आणि औषधांमुळे तुम्ही शरीरात तयार होणाऱ्या युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करू शकता. युरिक ॲसिडची अधिकता शरीराला बऱ्याच प्रकारे नुकसान पोहोचवते. आम्ही तुम्हाला अशा काही नॅचरल ड्रिंक्सबद्दल सांगत आहोत ज्याचे सेवन केल्याने शरीरातील युरिक ॲसिडचे स्तर कमी होतील आणि तुम्हाला त्याचा योग्य फायदा देखील मिळेल.**



**नारळपाणी**

युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करण्याचा सर्वात उत्तम उपाय पाणी आहे. पाण्याशिवाय नारळपाणी देखील युरिक ॲसिडला नियंत्रित करतो. हे युरिक ॲसिडला पातळ करून किडनीला उत्तेजित करतात ज्यामुळे शरीरातून युरिक ॲसिड मूत्राच्या माध्यमाने बाहेर निघून जाते.

**मोसंबी आणि पुदिना**

या ड्रिंकमध्ये पर्याप्त मात्रेत व्हिटॅमिन असतात, जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करण्यास मदत करतात. याचे सेवन करण्यासाठी मोसंबीचे साल काढून त्याच्या बारीक बारीक फोडी करून त्यात लिंबाचा रस आणि पुदिन्याचे पान घालावे व या मिश्रणाला मिक्सरमधून फिरवून त्याचा ज्यूस काढावा व त्याचे सेवन करावे.

**ब्लॅक चेरी आणि चेरी**

ब्लॅक चेरी आणि चेरीचा ज्यूस युरिक ॲसिडमुळे होणारे संधिवात किंवा किडनी स्टोनच्या समस्येसाठी योग्य आहे. ब्लॅक चेरी युरिक ॲसिडच्या सीरम स्तराला कमी करून संधिवात आणि किडनीहून क्रिस्टल दूर करण्यास मदत करते. यात अँटीऑक्सिडेंट आणि अँटी इंफ्लेमेंटरी गुणदेखील असतात, जे युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतात.

**खिऱ्याचे सूप**

खिऱ्याचे सूप शरीराला हायड्रेड ठेवण्यासोबत युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करतो. याचे सेवन करण्यासाठी एका भांड्यात खिऱ्याचा ज्यूस, पाव कप योगर्ट, पुदिन्याचे पान आणि लिंबाचा रस घालून मिक्सरमधून फिरवून घ्या आणि थोड्या वेळाने गार झाल्यावर त्याचे सेवन करा.

**सेबचा सिरका**

सेबचा सिरका शरीरातून युरिक ॲसिडला दूर करण्यास मदत करतो. अँटीऑक्सिडेंट आणि एंटीइंफ्लेमेंटरी गुणांमुळे हे शरीरात क्षारीय ॲसिड संतुलन बनवून ठेवतो. हा सिरका रक्ताच्या पीएच वॉल्यूमला वाढवून युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतो.

**अननसाचा ज्यूस**

या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी सोबत इतर अँटीऑक्सिडेंट असतात जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करून शरीरातून बाहेर काढण्यात मदत करतात. याचे सेवन केल्याने शरीराला दुसरे इतर फायदेदेखील मिळतात.

# अनशापोटी करा गुळाचे सेवन

**अनशापोटी गूळ खाल्ल्यास ४ फायदे होतात. आपल्यापैकी बहुतेक लोक रात्री जेवल्यानंतर गूळ खातात. त्यामुळे जेवण पचण्यास मदत होते. अनशापोटी गूळ खाल्ल्यावर कोमट पाणी प्यायल्यास त्याचे आरोग्यासाठी अनेक फायदे असतात.**

**रक्तदाब नियंत्रणात राहातो :** रक्तदाब नियंत्रणासाठी गूळ प्रभावी ठरतो. गुळामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शिअम आणि फॉस्फरस आढळते. हे हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहेत. गुळाबरोबर आले सेवन केल्यास सांधेदुखीपासून मुक्ती मिळते.



**रक्त साफ होते :** सकाळी अनशापोटी गूळ खाऊन कोमट पाणी प्यायल्यास रक्त स्वच्छ होते. त्यामुळे नवीन रक्त तयार होते. हृदयरोग होण्याचा धोका दूर ठेवण्यासही गुळाच्या सेवनाचा फायदा होता.

**शरीराला मिळते ताकद :** गुळाच्या नियमित सेवनाने शरीर ताकदवान होते. दिवसभराचा थकवा दूर होण्यासही मदत होते. शरीरात ऊर्जा पातळी कायम राहाते आणि ती कमी होत नाही.

**पचनसंस्था मजबूत होते :** ज्या लोकांना आहार सहजपणे पचवण्यात अडचणी येतात त्यांनी गूळ आणि गरम पाणी सेवन करावे. या व्यक्तींसाठी ते औषधासारखे कामकरते. त्याचबरोबर बद्धकोष्ठता, पोटात वायू होणे, ॲसिडीटीसारख्या समस्यांपासून सुटका होण्यास मदत होते.

# 'या' चुका टाळल्या तर लग्नात वधूचा मेकअप होणार नाही खराब!



**घरात लग्नकार्य असलं की कामाची नुसती लगबग सुरू असते. धावपळ, धांदल असा सगळा माहोल असतो. मात्र अशा वातावरणातही एक आनंद, उत्साह असतो. लग्न म्हणजे दोन जिवांचंच नव्हे तर दोन कुटुंबांचं मीलन असतं. त्यामुळे हा दिवस घरातल्या प्रत्येकासाठी खास असतो. त्यातच वधू-वरांचा थाट तर काही औरच असतो. प्रत्येकाचं लक्ष या दोघांकडेच वेधलेलं असतं. लग्नात आलेल्या पाहूण्यांच्या नजरा, कॅमेरा हे जणू वधू-वरांकडेच केंद्रित झालेले असतात. त्यामुळे लग्नात सुंदर दिसण्यावर या दोघांचाही भर असतो. त्यातच वधू असेल तर विचारायलाच नको. अगदी साड्यांपासून मेकअपपर्यंत प्रत्येक गोष्ट खास असण्यावर तिचा भर असतो. मेकअपमुळे सौंदर्यात भर पडतेच. मात्र बऱ्याच वेळा उत्तम प्रतीच्या मेकअपचं सामान वापरूनही तो मेकअप नीट सेट होत नाही किंवा ऐनवेळी तो खराब दिसून लागतो. हे असं का होतं यामागे बरीच कारणं आहेत. यामध्ये आपल्या बदललेल्या जीवनशैलीचादेखील समावेश आहे.**

**हेअर कलर :** बदलत्या काळानुसार रोज नवनवी ट्रेंड बाजारात येत असतात. सध्या तरुणाईमध्ये हेअर कलर करण्याची क्रेझ दिसून येत आहे. त्यामुळे बऱ्याच तरुणी वेगवेगळ्या रंगांनी केस कलर करत असतात. पण काही वेळेस उत्सुक होऊन केलेला हेअर कलर त्यांचा चेहऱ्याला शोभून दिसत नाही. त्यामुळे लग्नासाठीचा लुक खराब होऊ शकतो. हेअर कलर व्यवस्थित सेटल होण्यासाठी १० ते १५ दिवस लागतात. त्यामुळे लग्नाच्या ४ ते ५ दिवस आधी हेअर कलर केल्यास जो लूक आपल्याला अपेक्षित आहे तो मिळणार नाही. म्हणूनच लग्नापूर्वी जर केस कलर करायचे असतील तर निदान महिनाभर आधी कलर करावेत.



**हेअरकट :** हेअर कलरप्रमाणे हेअरकट देखील लग्नाच्या ४-५ दिवस आधी करू नये. कधी कधी हेअरकट आपल्याला हवा तसा होतं नाही किंवा तो ब्रायडल लूकला साजेसा नसतो. त्यामुळे लग्नात हेअरस्टाइल करताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे महिनाभर आधी हेअरकट केल्यास ते चांगले ठरते.

**लग्नापूर्वी सुंदर दिसण्यासाठी केलेले उपाय :** लग्नात सुंदर दिसावं ही प्रत्येक तरुणीची इच्छा असते. त्यामुळे बऱ्याच वेळा मुली फेशिअल, ब्लिच, क्लीनअप असे नानाविध प्रकार करतात. पण लग्नाच्या ४-५ दिवसआधी ब्यूटी ट्रीटमेंट करणं नुकसानदायक ठरत. कारण काही मुलींची स्कीन सेन्सिटीव्ह असते, काहींची ड्राय तर काहींची ऑइली असते. त्यामुळे अशा त्वचेसाठी वेगवेगळ्या ब्युटी ट्रीटमेंट असतात. मात्र काही वेळा योग्य प्रोडक्ट किंवा क्रीम न वापरल्यामुळे त्याचा परिणाम चेहऱ्यावर होऊ शकतो. चेहऱ्यावर लाल पूरळ किंवा पुटकुळ्या येऊ शकतात.

**अतिरिक्त व्यायाम :** लग्नात बारीक दिसावं याकडे मुलींचा जास्त कल असतो. त्यामुळे मुली बऱ्याचदा लग्नापूर्वी डाएट, व्यायाम करतात. तसंच लग्नाच्या १०-१२ दिवस आधी हार्ड वर्कआऊट करतात. परंतु यामुळे त्या थकतात आणि सोबतच चेहरा ही अगदी फिका पडतो.

**फास्ट फूड खाणे :** लग्नात मेकअपमुळे तर आपलं सौंदर्य वाढतंच मात्र त्याचप्रमाणे चेहऱ्यावर तजेला असणंही गरजेचं आहे. तजेला असेल तरच सौंदर्यात भर पडते. नितळ आणी सतेज चेहरा हवा असेल तर आपल्या आहाराकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. या काळात फास्ट फूड खाणं कमी करावं आणि पौष्टीक पदार्थ खाण्यावर भर द्यावा. फास्ट फूड खाल्यामुळे बऱ्याचदा चेहऱ्यावर पिंपल्स येण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो फास्ट फूड टाळावे.

# घसादुखीवर 'हे' झटपट घरगुती उपाय नक्की येतील कामी

**ऋतू** बदलले की शरीराच्या अनेक समस्या उद्‌भवतात. तसेच थंडीत अंगदुखी, पाठदुखीसोबत घसा खवखवणे, घसा दुखणे असे आजार देखील उद्भवतात. अशा वेळी आपल्याला कधी कधी गिळताना, बोलताना घशाला त्रास होतो. यालाच Throat inffection असेही म्हणतात. साधारणतः सर्दी, खोकला याप्रमाणे हा घशाला होणारा त्रास हे देखील व्हायरल इन्फेक्शन आहे. हे इन्फेक्शन काही दिवसांत आपोआप कमी होते. यामुळे याच्यावर काही इलाज करु नये असेही नाही. त्या समस्येकडे लक्ष न दिल्यास घशाला सूज येणे, टॉन्सिल्स लाल होणे, त्यावर पांढरे चट्टे येणे यांसारखे गंभीर आजार होऊ शकतात. अशा वेळी मग यावर त्वरित काय उपाय करता येईल अशा प्रश्न अनेकदा पडतो. म्हणूनच यावर झटपट घरगुती उपाय कोणते करता येईल ते पाहूया..



१. घशाला सूज उतरवण्यासाठी गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करता येतील.

२. घसा दुखत असल्यास तोंडात आल्याचा तुकडा ठेवल्यास थोडा आराम मिळतो.

३. आलं, टोमॅटो आणि मधाचा रस एकत्र करून घेतल्याने घसादुखीपासून आराम मिळतो.

४. मध आणि कांदा टाकून उकळलेलं पाणी गाळून ते थोड्या-थोड्या वेळाने प्यावे.

५. पाण्यात बडीशेप टाकून ते पाणी उकळून घ्यावं आणि त्यानंतर त्यात मध टाकून हे पाणी थोड्या थोड्या वेळाने प्यावे. याने घशाला आराम मिळेल.

याप्रमाणेच लिंबाचा रस आणि मध टाकलेले गरम पाणी प्यायल्यानेही घशाला आराम मिळतो. लवंग चघळल्यानेही घसादुखी कमी होते. थंडीत तुम्हाला जर तुम्हाला घसादुखीचा त्रास उद्‌भवत असेल तर हे उपाय नक्कीच मदत करतील.

# प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ अव्वल
# गणेशोत्सवाच्या संकल्पनेचे देशभरात कौतुक

**■ बातमी /लेख, विनोद दशगथ मेढे**

भारताच्या ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील कर्तव्यपथावर झालेल्या भव्य सोहळ्यात महाराष्ट्राच्या चित्ररथाने बाजी मारली आहे. यंदाच्या संचलनामध्ये राज्यांच्या चित्ररथांच्या स्पर्धेत महाराष्ट्राने पहिला क्रमांक तर जम्मू-काश्मीर राज्याने दुसरा आणि केरळ राज्याने तिसरा क्रमांक पटकावला आहे. केंद्र सरकारने या निकालांची अधिकृत घोषणा केली आहे.

**दिल्ली पोलिसांच्या संचलन पथकाला सर्वोत्कृष्ट पुरस्कार**

फक्त राज्यांच्या श्रेणीतच नाही, तर इतर विभागांतही चुरस पाहायला मिळाली. सेना दलांच्या गटात भारतीय नौदलाच्या संचलन पथकाला, तर निमलष्करी दलांच्या गटात दिल्ली पोलिसांच्या संचलन पथकाला सर्वोत्कृष्ट पुरस्कार देण्यात आला. केंद्रीय मंत्रालयांच्या गटात सांस्कृतिक मंत्रालयाच्या चित्ररथाने प्रथम क्रमांक मिळवला. तर, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग आणि 'वंदे मातरम्' नृत्य समूहाला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**'पॉप्युलर चॉईस' निकालही जाहीर**

MyGov पोर्टलवर घेण्यात आलेल्या ऑनलाईन व्होटिंगवर आधारित 'पॉप्युलर चॉईस' श्रेणीचे निकालही जाहीर करण्यात आले आहेत. तीनही सैन्यदलांमध्ये आसाम रेजिमेंट सर्वोत्कृष्ट संचलन पथक ठरले. तर, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल व सहाय्यक दलांमध्ये केंद्रीय राखीव पोलिस दलला सर्वाधिक मते मिळाली आहेत.

चित्ररथांच्या 'पॉप्युलर चॉईस' विभागात गुजरात – 'स्वदेशी मंत्र : आत्मनिर्भरता – स्वातंत्र्य : वंदे मातरम्' (प्रथम), उत्तर प्रदेश – बुंदेलखंडची संस्कृती (द्वितीय) तर राजस्थान – ह्यवाळवंटाचा सुवर्णस्पर्श : बिकानेर गोल्ड आर्ट (तृतीय) असे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

**शिक्षण विभागाचाही सन्मान**

केंद्रीय मंत्रालयांमध्ये शालेय शिक्षण व साक्षरता विभागाला 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : विकसित भारताच्या दिशेने भारतीय शालेय शिक्षणाची झेप' या चित्ररथासाठी पॉप्युलर चॉईस पुरस्कार देण्यात आला.

**'गणेशोत्सव' चित्ररथ अव्वल**

यंदा महाराष्ट्राने 'गणेशोत्सव : आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला होता. या चित्ररथातून महाराष्ट्राची समृद्ध लोकसंस्कृती, गणेशोत्सवाची परंपरा, तसेच या उत्सवातून निर्माण होणारे रोजगार आणि आत्मनिर्भरतेचा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला. चित्ररथावरील भव्य गणेशमूर्ती, पारंपरिक ढोल-ताशा पथक आणि लेझीम खेळणाऱ्या कलाकारांनी कर्तव्यपथावर उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या उत्कृष्ट सादरीकरणामुळे परीक्षकांनी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या गटातून महाराष्ट्राच्या चित्ररथाला सर्वोत्तम चित्ररथ म्हणून घोषित केले.




## जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांबाबत राज्य निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

**■मुंबई। प्रतिनिधी,**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान; तर ७ फेब्रुवारी २०२६ ऐवजी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल. राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १३ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी ३१ जानेवारी २०२६ च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदत वाढ दिली आहे. पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात २८ जानेवारी २०२६ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना ३१ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करतील, अशी माहिती जारी करण्यात आली आहे.




**आता मतदानाचा कार्यक्रम कसा असेल?**

आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजता होईल. संबंधित ठिकाणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

## श्री मलंगगड यात्रेसाठी पोलीस प्रशासन सज्ज



**■कल्याण। प्रतिनिधी,**

ठाणे जिल्ह्यातील प्रमुख श्रद्धास्थान असलेल्या श्री मलंगगड यात्रेला माघ पौर्णिमेनिमित्त सुरुवात होत आहे. या यात्रेदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि भाविकांना सुलभ दर्शन मिळावे, यासाठी अप्पर पोलिस आयुक्त संजय जाधव यांनी सर्व यंत्रणांचा सखोल आढावा घेतला. यात्रेच्या पूर्वसंध्येला आयोजित बैठकीत पोलीस, महसूल, महावितरण, आरोग्य आणि वाहतूक विभागासह विविध हिंदू संघटनांचे प्रतिनिधी व वंशपरंपरागत ट्रस्टी उपस्थित होते.

संपूर्ण यात्रा परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली असेल. ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्वात मोठा फौजफाटा हिललाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीत तैनात करण्यात आला आहे. नेवाळी ते श्री मलंगगड मार्गावर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विशेष पार्किंग झोन तयार करण्यात आले आहेत. भाविकांच्या सोयीसाठी एसटी महामंडळामार्फत जादा बस सोडण्यात येणार आहेत.

वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी महावितरणला सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच आरोग्य विभाग, अग्निशमन दल आणि पाणीपुरवठा यंत्रणा २४ तास कार्यरत राहणार आहेत. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी गडाच्या पायथ्याशी विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

जया एकादशीच्या पहाटे वंशपरंपरागत पुजारी ॲड. विजय केतकर यांच्या निवासस्थानावरून पालखीचे प्रस्थान होईल. माघ पौर्णिमेच्या मुख्य दिवशी गडावर पालखी सोहळा पार पडणार असून, देशभरातून येणाऱ्या लाखो भाविकांच्या स्वागतासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.

## अंबरनाथ शहरात घरपट्टी थकबाकीदारांसाठी अभय योजना लागू

**■अंबरनाथ। प्रतिनिधी,**

शहरातील मालमत्ता कर थकबाकी असलेल्या नागरिकांना अंबरनाथ नगर परिषद प्रशासनाने अभय योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत थकबाकीदारांना मूळ कर रकमेवर ५०% शास्ती मिळणार आहे. नागरिकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन नगराध्यक्ष तेजश्री करंजुले-पाटील यांनी केले आहे. ही योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत लागू राहणार आहे. अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित करदारांनी नगर परिषदेच्या मालमत्ता कर विभागाशी संपर्क साधावा किंवा नगर परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन थकबाकी रक्कम जमा करावी.




## अनधिकृत हातभट्ट्यांवर पोलिसांची मोठी कारवाई

**■वसई। प्रतिनिधी,**

नायगाव परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर हातभट्ट्यांवर नायगाव पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने रविवारी धडक कारवाई केली. कामण येथील बेलकडी जंगल भागात टाकण्यात आलेल्या छाप्यांमध्ये दोन अवैध दारूभट्ट्या उद्ध्वस्त करण्यात आल्या असून, या प्रकरणी तीन व्यक्तींविरोधात नायगाव पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, बेलकडी जंगल परिसरात राजेश हडळ हा बेकायदेशीररीत्या गावठी दारू तयार करत असल्याचे समोर आले. त्यानुसार पोलिस पथकाने छापा टाकत एका दारूभट्टीवर कारवाई केली.

यावेळी सुमारे ३०० लिटर तयार गावठी दारू, २४०० लिटर नवसागर मिश्रित तयार गुळाचा नाशवंत वॉश, १४ रिकामे ड्रम तसेच भट्टीसाठी लागणारे लाकुड जप्त केले.

याच जंगल परिसरात काष्टीच्या नाल्याजवळ चंद्रकांत खरपुडे व संतोष मलाचकर हे दारू निर्मिती करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्या ठीकाणीही छापा टाकून एक हातभट्टी उद्ध्वस्त करण्यात आली. या कारवाईत अंदाजे २५० लिटर गावठी दारू, ३२४० लिटर नाशवंत वॉश, एक डोल, १८ रिकामे ड्रम, भट्टीसाठी लागणारे लाकूड आणि दोन प्लास्टिकचे कॅन जप्त करण्यात आले.

दोन्ही कारवायांमध्ये एकूण ३ लाख ६७ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही यशस्वी कारवाई सपोनि गणेश केकान, ज्ञानेश्वर आसबे, शेखर पवार तसेच सचिन मोहिते, चेतन ठाकरे, सचिन खंताळ, अमर पवार, अशोक पाटील आणि पांडुरंग महाले यांच्या पथकाने पार पाडली.

अवैध हातभट्टी व्यवसायामुळे परिसरात गुन्हेगारी, आरोग्यधोके आणि सामाजिक अस्थिरता वाढत असून अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. अशा बेकायदेशीर व्यवसायांवर वेळोवेळी कठोर कारवाई करणे गरजेचे असून पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अवैध दारू व्यवसायीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## उल्हासनगरात रात्री १२ वाजेपासून २४ तास पाणीपुरवठा बंद... शनिवारीही मर्यादित पुरवठा

**शनिवारीही कमी दाबाने पुरवठा?**

दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर शनिवार, ३१ जानेवारी रोजी कमी दाबाने व मर्यादित प्रमाणात पाणीपुरवठा पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काही दिवस पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन उल्हासनगर महापालिकेचे कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा विभाग) अशोक घुले यांनी केले आहे.



**■उल्हासनगर । प्रतिनिधी,**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) तर्फे जांभूळ जलशुद्धीकरण केंद्र तसेच बारवी गुरुत्ववाहिनीवर महत्त्वाचे दुरुस्ती व देखभाल काम हाती घेण्यात आल्यामुळे उल्हासनगर शहराचा पाणीपुरवठा तब्बल २४ तास पूर्णपणे बंद राहणार आहे. गुरुवार, २९ जानेवारी रोजी मध्यरात्री १२ वाजेपासून ते शुक्रवार, ३० जानेवारी रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत हा पुरवठा बंद राहील.

या कालावधीत उल्हासनगर महानगरपालिकेला होणारा पाणीपुरवठा पूर्णतः ठप्प राहणार असून कॅम्प क्रमांक ४, कॅम्प क्रमांक ५ तसेच कॅम्प क्रमांक ३ मधील काही भागांत नागरिकांना पाण्याचा तुटवडा जाणवण्याची शक्यता आहे. एमआयडीसीकडून जांभूळ जलशुद्धीकरण केंद्र आणि बारवी गुरुत्ववाहिनीवरील देखभाल व तांत्रिक दुरुस्तीची कामे अत्यावश्यक असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक तेवढे पाणी साठवून ठेवावे व जपून वापरावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## ४ अल्पवयीन मुली अचानक बेपत्ता! दोघी यापूर्वीही घर सोडून गेल्या होत्या, कुटुंबीय म्हणाले की...

**■कल्याण। प्रतिनिधी,**

औरंगाबाद येथून ४ अल्पवयीन मुली मागील पाच दिवसांपासून बेपत्ता असल्याची बातमी समोर आली आहे. पीडित मुलींच्या कुटुंबियांच्या म्हणण्यानुसार, १८ जानेवारीपासून बेपत्ता असलेल्या मुलींचा काहीच पत्ता लागू शकला नाही. मुली एखाद्या संघटित टोळीतील लोकांच्या वाईट कृत्याला बळी पडल्या नाहीत ना? अशी त्यांच्या कुटुंबियांना भिती आहे.

**यापूर्वी देखील दोन वेळा घरातून गायब...**

पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. सर्व्हर स्लो असल्याकारणाने फोनचा सीडीआर अद्याप मिळू शकला नाही. हे प्रकरण लवकरच सोडवलं जाणार असल्याचं त्यांनी म्हटलं. तसेच त्यांनी सांगितलं की, बेपत्ता झालेल्या चार मुलींपैकी दोन मुली यापूर्वी कोणालाही न कळवता दोन वेळा घराबाहेर पडल्या होत्या, परंतु घरी परतल्यानंतर त्यांनी फिरायला गेलं असल्याचं सांगितलं होतं.

आता, चार मुली बेपत्ता झाल्याची घटना परिसरात चर्चेचा विषय बनली आहे. मुलींचे कुटुंबीय देखील चिंतेत असून पोलीस या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करत असल्याची माहिती आहे. कुटुंबीय पोलिसांशी सतत संपर्कात आहे आणि प्रत्येक संभाव्य दृष्टिकोनातून प्रकरणाचा तपास केला जात आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, प्रकरणातील सत्य समोर आल्यानंतर आरोपी व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाईल.




**कुटुंबियांनी दाखल केली तक्रार**

संबंधित प्रकरण हे देव पोलीस स्टेशन हद्दीतील तिलौता बिगहा गावातील असल्याची माहिती आहे. बेपत्ता असलेल्या मुलींबद्दल अद्याप कोणतीच माहिती हाती लागलेली नाही. घटनेतील एका बेपत्ता मुलीच्या कुटुंबीयांनी इतर तीन मुलींवर त्यांच्या मुलीला फसवल्याचा आरोप केल्यानंतर 18 जानेवारीपासून बेपत्ता असलेल्या या मुलींचं प्रकरण उघडकीस आलं आहे. देव पोलीस ठाण्यात कुटुंबियांनी तक्रार दाखल करून मुलीचा लवकरात लवकर शोध घेण्याची मागणी केली.

## मद्यधुंद स्कूल बस चालकाची अनेक वाहनांना धडक... वाघोलीमधील बाईफ रोड वादाच्या भोवऱ्यात

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुणे जिल्ह्यातील वाघोली परिसरात काल दुपारी अडीच ते पावणे तीन वाजण्याच्या सुमारास एक भीषण आणि धक्कादायक अपघात घडला. इंडो स्कॉट ग्लोबल स्कूलची (बायफ रोडवरील) स्कूल बस चालवताना बसचालक मद्यधुंद अवस्थेत होता.

या बसने रस्त्यावरून जात असताना चार दुचाकीस्वार आणि एका कारला जोरदार धडक दिली. धडकेनंतर बसने या वाहनांना काही अंतर फरफटत नेल्याची माहिती समोर आली आहे.

या अपघातात सुदैवाने कोणत्याही व्यक्तीला गंभीर जखम झाली नाही किंवा जीवितहानी झाली नाही. बसमध्ये ३० ते ४० विद्यार्थी होते, ज्यांना घेऊन चालक घरी सोडण्यासाठी निघाला होता. मात्र, मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवल्याने ही घटना घडली, ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ प्रतिसाद दिला. ते ओरडा-ओरडा करत बसच्या मागे धावले आणि बस थांबवली. संतप्त झालेल्या नागरिकांनी बसचालकाला चोप दिला आणि त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले. गर्दी जमली आणि काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

पोलिसांनी बसचालक बत्ता वसंत रसाळ (वय ५० वर्षे, रा. वाघोली) याला तात्काळ अटक केली आहे. या प्रकरणी पोलिस कर्मचारी प्रशांत भगवान धुमाळ (वय ३६) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्याच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू आहे.

या घटनेमुळे पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. स्कूल बस चालकांनी मद्यपान करून वाहन चालवणे हे अत्यंत गंभीर आणि अस्वीकार्य आहे. अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी स्कूल प्रशासनाने चालकांची नियमित तपासणी, ब्रेथलाइझर चाचणी आणि फिटनेस प्रमाणपत्रांची काटेकोर तपासणी करणे आवश्यक आहे. पालक आणि नागरिकांनीही अशा घटनांबाबत सजग राहून तक्रार नोंदवणे गरजेचे आहे.

पोलिसांनी या प्रकरणात कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले असून, बसचालकावर योग्य ती कायदेशीर कारवाई होईल. या घटनेनंतर वाघोली परिसरातील रस्ते सुरक्षिततेसाठी अधिकाधिक पावले उचलण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.



## रक्तबंबाळ अवस्थेत घरी आली मुलगी, शेजाऱ्यानेच...

**■मुंबई । प्रतिनिधी,**

सामूहिक बलात्काराच्या घटनेने दिल्ली पुन्हा हादरली. चिमुकल्या मुलीला नूडल्स देण्याच्या बहाण्याने तिच्यासोबाबत अल्पवयीन मुलांनीच गँगरेप करण्याचा भयंकर प्रकार घडला आहे.

**नेमकं काय घडलं?**

दिल्लीतील भजनपूर भागात ही घटना घडली असून. १०, १३, आणि १४ वर्षांच्या मुलांनी ६ वर्षांच्या मुलीवर सामूहिक बलात्कार केला आहे. घटनेच्या काही तासांपूर्वी पीडित मुलीला तिच्या वडिलांनी चॉकलेट देऊन घराबाहेर सोडले होते. त्यानंतर त्या ठिकाणाहून तीन आरोपींनीं मुलीला नूडल्स देण्याचे आमिष दाखवत एका बिल्डिंगमध्ये सामूहिक बलात्कार केला. आरोपीनी पीडित मुलीचे हात बांधून आणि तोंड दाबून तिच्यावर हा धक्कादायक प्रकार केला. पीडित मुलगी रक्तबंबाळ अवस्थेत घरी पोचली. तिची ती अवस्था बघून कुटुंबीय घाबरले.

**आरोपीचा शोध**

मुलीला विश्वासात घेऊन कुटुंबीयांनी विचारले असता तिच्या शेजारी राहणाऱ्या मुलानेच हा प्रकार केल्याचे कळले.

**मुलीची अवस्था**

मेडिकल रिपोर्ट मधून समोर आले की मुलगी आता चालू शकत नाही, मुलीच्या आईनेही सांगितले की मुलगी उठली किंवा बसली तर तिला प्रचंड त्रास होतोच शिवाय रक्तस्त्राव ही होत आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या कुटुंबीयांनी केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी मुलांविरोधात गुन्हा दाखल केला आहे पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतलं तर तिसऱ्याच शोध सुरु आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००০१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com